सायबर पोलीस ठाणे, वांद्रे-कुर्ला कॉम्प्लेक्स येथे दाखल गु.र.नं.०८/२०१७ मधून उद्भवणा-या न्यायालयीन प्रकरणांमध्ये विशेष सरकारी अभियोक्ता म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या ॲड.श्री.आबाद पोंडा यांना व्यावसायिक फी मंजूर करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्रमांकः एसपीपी ०७१७/प्र.क्र.१७३/पोल-१०
गृह विभाग, २ रा मजला, मंत्रालय,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड, मुंबई-४०० ०३२
दिनांक : २६ ऑक्टोबर, २०१७

संदर्भ:- **शासन अधिसूचना, विधी व न्याय विभाग क्र. एसपीपी १०१७/७४६/सी.आर.९०/डी-१४, दिनांक ०५ मे,२०१७**

शासन निर्णय:

सायबर पोलीस ठाणे, वांद्रे-कुर्ला कॉम्प्लेक्स येथे दाखल गु.र.नं.०८/२०१७ मधून उद्भवणा-या न्यायालयीन प्रकरणांमध्ये शासनाच्या वतीने कामकाज पहाण्यासाठी ॲड. श्री.आबाद पोंडा यांची विधी व न्याय विभागाच्या वरील संदर्भाधीन दिनांक ०५ मे, २०१७ च्या अधीसूचनेद्वारे विशेष सरकारी अभियोक्ता म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. श्री.पोंडा यांनी न्यायालयीन कामकाज पाहिल्याबाबत दिनांक २० एप्रिल, २०१७ च्या पत्रान्वये एकुण तीन सुनावण्यांचे प्रतिदिन फी रु.१,५०,०००/- प्रमाणे एकुण रुपये ४,५०,०००/- (रुपये चार लाख पन्नास हजार फक्त) चे देयक सादर केलेले आहे. सदर देयकात नमूद केल्यानुसार ॲड.श्री.पोंडा हे न्यायालयात युक्तीवादाकरीता दिनांक ०६.०४.२०१७, ११.०४.२०१७ व २०.०४.२०१७ रोजी उपस्थित राहीले आहेत. त्यामुळे ॲड.श्री आबाद पोंडा यांना त्याबाबत प्रतिदिन फी रु.१,५०,०००/- प्रमाणे एकुण तीन सुनावण्यांचे रुपये ४,५०,०००/- (रुपये चार लाख पन्नास हजार फक्त) इतकी फी अदा करण्यास शासन मान्यता देत आहे.

२. परिणामकारक सुनावणीचे दिवस संबंधीत प्रकरणाच्या पर्यवेक्षीय पोलीस उपायुक्त दर्जाहून कमी नाही, अशा अधिका-याकडून प्रमाणित करुन घेण्यात यावेत व कोणत्याही प्रकारचे अतिरिक्त प्रदान होणार नाही, याची दक्षता घ्यावी. तसेच, प्रस्तुत प्रकरणी ॲड.श्री.आबाद पोंडा यांना अपरिणामकारक सुनावणी फी अथवा इतर कोणतीही फी अनुज्ञेय असणार नाही.

यासाठी येणारा खर्च या विभागाच्या मागणी क्र. बी-१, २०५५ पोलीस - (००) १०८, राज्य मुख्यालय पोलीस (०२) (०१) शहर पोलीस आस्थापना - (२०५५ ००९७) - २८ व्यावसायिक सेवा या लेखाशिर्षाखालील त्या त्या आर्थिक वर्षाच्या मंजूर अनुदानातून मासिक निधी विवरणपत्रानुसार भागविण्यात येईल.

४. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.२५७/१७/व्यय-७, दिनांक २२/०९/२०१७ अन्वये मिळालेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१०२६१६२२०३४८२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Kishor Shyamrao Bhalerao

Digitally signed by Kishor Shyamrao Bhalerao
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ce6f6edd7e1dfc6b4d6b65b7d93aa1a1dbcf0ec79c7c2143850ff6e8fdcb4c0d, serialNumber=94524ab889e2fa9e6bfe5e1e58426881bc36b968ffd0f45ce2d4bd3ff527ded2, cn=Kishor Shyamrao Bhalerao
Date: 2017.10.26 16:11:50 +05'30'

(कि.शा.भालेराव)
उप सचिव (विधि),गृह विभाग, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. पोलीस आयुक्त, मुंबई.
२. महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई .
३. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
४. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
५. ॲड.श्री.आबाद पोंडा, ३०१ अेअे, सावला चेंबर्स, ४०, कावसजी पटेल स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
६. विधी व न्याय विभाग (का १४), मंत्रालय, मुंबई.
७. वित्त विभाग (व्यय- ७), मंत्रालय, मुंबई.
८. निवड नस्ती (पोल-१०).